कर भरा, राष्ट्र घडवा.


# महाराष्ट्र शासन
## वस्तू व सेवाकर विभाग
## विशेष राज्यकर आयुक्तांचे कार्यालय, माझगांव, मुंबई

ई-मेल आयडी –dcest००१@gmail.com , दूरध्वनी क्रमांक - ०२२ २३७६०३९८/०८६८


**क्रमांक** - राज्य.निरी २०२३/सरळसेवा नियुक्ती/१/म.लो.आ./आस्था-४/ब- ९१ मुंबई दि. 18 MAR 2026

# आदेश

**संदर्भ:-** १. राज्यकर निरीक्षक, अराजपत्रित गट- "ब" (सेवाप्रवेश) नियम,२०२१ दि.०१ मार्च २०२१.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ दि.२१ जून, २०२१.

३. शासन निर्णय क्र. चापअ १०१२/प्र.क्र.६३/१६-अ दि. २६.०८.२०१४.

४. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शासनास पाठवलेले पत्र क्र.१४४२(२)(३)/२०२३/तेवीस दिनांक-२१.०८.२०२४

५. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शासनास पाठवलेले पत्र क्र.१४४२(२)(२)/२०२३/तेवीस दिनांक-२४.०४.२०२४

६. कार्यासन अधिकारी, वित्त विभाग यांचे पत्र क्र.विकनि-११२२-प्र.क्र.१७६/वि.प्र.-२ दिनांक.०२.०९.२०२४

उपरोक्त संदर्भान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांनी **महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा-२०२३** अंतिम निकालाच्या आधारे राज्यकर निरीक्षक [गट-ब (अराजपत्रित)] पदावरील नियुक्तीसाठी १५९ गुणवत्ताधारक उमेदवारांची शिफारस केली आहे. त्यापैकी सोबत जोडलेल्या यादीतील **१ उमेदवारांची** नामनिर्देशनाने, राज्यकर निरीक्षक पदी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येत आहे. उपरोक्त संदर्भ क्र. २ वरील महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियम २०२१, मधील नियम २(१) (ड) नुसार त्यांच्या नियुक्तीचे आदेश निघाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत रुजू होण्याची तरतूद आहे. सदर विहीत कालावधीत उमेदवार रुजू झाला नाही तर तो नोकरीची संधी गमावेल व त्याचा नियुक्तीकरीता विचार करता येणार नाही. यासाठी उमेदवारांकडून देण्यात येणाऱ्या कोणत्याही कारणांचा/विनंतीचा विचार केला जाणार नाही. तथापि, संदर्भ क्र. २ वरील ज्येष्ठतेचे विनियमनान्वये केंद्र शासन/ राज्य शासन सेवेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना वाढीव मुदत विहीत करण्यात आली आहे. तसेच उपरोक्त संदर्भ क्र.२ वरील ज्येष्ठतेचे विनियमनान्वये विहित मुदतीत रुजू न होणा-या उमेदवारांचे नियुक्तीचे आदेश रद्द केल्यानंतर त्यांचा कोणत्याही परिस्थितीत पुन्हा पुनर्नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.

सदर नियुक्ती खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून **निव्वळ तात्पुरत्या** स्वरुपात करण्यात येत आहेत.

**१. ज्या उमेदवारांची नियुक्ती राखीव प्रवर्गातून झाली आहे त्यांच्या बाबतीत संबंधित आस्थापना अधिकाऱ्यांना आदेशित करण्यात येते की, शासन निर्णय क्र. बीसीसी २०११/प्र.क्र. १०६४/२०११/१६-ब दि.१२.१२.२०११ मधील तरतुदीनुसार उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात वैधता पडताळणी समितीकडून प्राप्त करुन घेवून आस्थापना कार्यालयामार्फत नियुक्ती प्राधिकाऱ्यास सादर करणे आवश्यक आहे. यास्तव सदर उमेदवारांकडून जातवैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन या कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे.**

**उमेदवाराने सहा महिन्याच्या आत सदर जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास, उमेदवाराने सेवा प्रवेशासाठी दावा केलेला जातीचा दाखला चुकीचा आहे असे मानण्यात येईल व उमेदवारावर महाराष्ट्र अनुसुचित जाती, अनुसुचित जमाति, विमुक्त जाती, भटक्या जमाति, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र व त्यांच्या पडताळणी विनियमन) अधिनियम, २००० यातील कलम दहा नुसार सेवा समाप्तीची पुढील कार्यवाही करण्यात येईल. यास्तव सदर**

**आदेशातील उमेदवारांनी सहा महिन्याच्या आत सदर जातवैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास ते त्यांच्याकडे उपलब्ध नाही असे गृहित धरुन सहा महिन्यानंतर अशा उमेदवारांच्या सेवा समाप्ती बाबतचे प्रस्ताव शासन निर्णय दि. १०.०८.२००४ मधील तरतुदीस अनुसरुन संबंधित आस्थापना अधिकारी यांनी मागासवर्ग कक्ष, आस्थापना-८ यांच्या कार्यालयामार्फत नियुक्ती प्राधिकारी तथा मा. विशेष राज्यकर आयुक्त यांच्या कार्यालयाकडे पाठविणे बंधनकारक आहे. अशा उमेदवारांचे सेवा समाप्तीचे आदेश तात्काळ निर्गमित करण्यात येतील. संबंधित प्रकरणी सेवा समाप्तीचे प्रस्ताव पाठविण्यात हलगर्जीपणा आढळल्यास आस्थापना अधिकाऱ्यावर कठोर कार्यवाही करण्यात येईल.**

राज्यकर निरीक्षक पदावर शिफारस झाल्यामुळे रुजु होण्यासाठी हजर राहतेवेळी सर्व उमेदवारांना नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाचा परिविक्षाधिन कालावधी पूर्ण करण्यासंदर्भातील बंधपत्र (परिशिष्ट-अ) व दोन जामीनदारांकडून भरुन घ्यावयाचे जामीन बंधपत्र (परिशिष्ट-ब) सादर करणे आवश्यक राहील. परिशिष्ट-अ व परिशिष्ट-ब मधील बंधपत्र नोटरी करुन सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा, उमेदवारास राज्यकर निरीक्षक पदावर हजर करुन घेण्यात येणार नाही. तसेच सदर जामीन बंधपत्र समाधानकारक नसल्यामुळे स्विकारार्ह नसेल तर उमेदवारांस जामीन बंधपत्र पुन्हा सादर करावे लागेल. परिशिष्ट अ व ब मधील बंधपत्राचे नमुने विभागाच्या www.mahagst.gov.in या संकेतस्थळावर "Whats New" या सदराखाली उपलब्ध आहेत.

२. अ) या राज्यकर निरीक्षकांचा सुधारित वेतन मॅट्रीक्स मधील वेतनस्तर **S-१४: ३८६००-१२२८००** असा राहील.

ब) या वेतन बँड व्यतिरिक्त शासन वेळोवेळी ठरविल त्या दराने महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व स्थानिक पूरक भत्ता अनुज्ञेय राहील.

क) या राज्यकर निरीक्षकांना प्रथम वेतनवाढ विहित नियमानुसार देण्यात येईल व त्यानंतरची वेतनवाढ परिविक्षाधिन कालावधी समाधानकारकरीत्या पूर्ण केल्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आल्यानंतर मिळेल. राज्यकर निरीक्षक पदावरील नियुक्ती दोन वर्षाच्या परिविक्षाधिन कालावधीकरिता (On Probation) राहील. परिविक्षाधिन कालावधीबाबत शासन निर्णय क्रमांक परिवी-२७१५/प्र.क्र .३०२/आठ दि.२९.०२.२०१६ मधील, राज्यकर निरीक्षक, अराजपत्रित गट- "ब" (सेवाप्रवेश) नियम,२०२१ तसेच वेळोवेळी नव्याने निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयातील तरतूदी लागू राहतील. सदर परिविक्षाधिन कालावधी संपण्यापूर्वी जर उमेदवाराने राज्यकर निरीक्षक पदाचा राजीनामा दिला अथवा वस्तू व सेवाकर विभागातून कार्यमुक्त होवून महाराष्ट्र शासनाच्या इतर खात्यामध्ये नियुक्त झाल्यास सदर उमेदवारांकडून बंधपत्रापोटी नियमानुसार लागू असलेली रक्कम वसूल करण्यात येईल.

३. राज्यकर निरीक्षक पदावरील नियुक्ती, **चारित्र्य पडताळणी** व **वैद्यकीय तपासणीच्या** अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत आहे. पदावर रुजू होताच सदर उमेदवारांस तात्काळ वैद्यकीय तपासणीसाठी पाठविण्यात येईल. सक्षम वैद्यकीय प्राधिकाऱ्याने वैद्यकीय दृष्टया राज्यकर निरीक्षक पदासाठी जर उमेदवारास अयोग्य ठरविले तर सदर उमेदवाराची नियुक्ती संपुष्टात आणण्याचा अधिकार वस्तू व सेवाकर विभागाने राखून ठेवला आहे. तसेच उमेदवाराचा प्रतिकूल चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त झाल्यास सदर उमेदवाराची नियुक्ती संपुष्टात आणण्याचा अधिकार वस्तू व सेवाकर विभागाने राखून ठेवला आहे. प्रसंगी सदर उमेदवारास रुजू झाल्याच्या दिनांकापासून नेमणूक संपुष्टात आणण्याच्या दिनांकापर्यंत दिली गेलेली रक्कम विभागास परत करण्याचा अथवा देय असलेली रक्कम राखून ठेवण्याचा हक्क वस्तू व सेवाकर विभागास असेल.

४. या उमेदवारांना राज्यकर निरीक्षक सेवा प्रवेश नियम २०२१ व विभागीय परिक्षेबाबतच्या विक्रीकर निरीक्षक व वरिष्ठ लिपिक यांचे एकत्रित परीक्षा नियम १९७२ मधील तसेच दि.३१.०३.२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदी लागू राहतील. सदर तरतूदीनुसार विहित केलेल्या कालावधीत व विहित संधीत राज्यकर निरीक्षक भाग-१ व भाग-२ या विभागीय परिक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील. तसेच मराठी व हिंदी भाषा परीक्षा जर ते यापूर्वीच उत्तीर्ण झाले नसतील किंवा त्यांना परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल, तर त्यांना एतदर्थ मंडळाच्या हिंदी व मराठी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहिल. विहित मुदतीत परिक्षा उत्तीर्ण न झाल्यास राज्यकर निरीक्षक पदावरील सेवा कोणतीही पूर्व सुचना न देता समाप्त करण्यात येईल.

५. खालील अटी पूर्ण न करणारे उमेदवार त्यांची सेवा कोणतीही पुर्वसूचना न देता, समाप्त करण्यास अथवा सेवेतून कमी करण्यास पात्र असतील.

अ) ज्यांचे काम परिविक्षा कालावधीत अपेक्षित दर्जाचे आढळून येणार नाही.

ब) ज्यांची वर्तणूक असमाधानकारक अथवा पदास शोभेशी आढळून येणार नाही.

क) जे विभागीय परिक्षा किंवा प्रशिक्षण परिक्षा विहित कालावधीत /संधीत उत्तीर्ण होणार नाहीत.

ड) जे वैद्यकीय तपासणी मध्ये शासकीय सेवेस पात्र ठरणार नाहीत.

इ) चारित्र्य पडताळणी अहवालाबाबत प्रतिकूल शेरे आढळून आल्यास.

६. या उमेदवारांना महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी/ वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) नियम, १९९९ मधील तरतूदी आणि शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र. प्रशिक्षण २०००/ प्र.क्र.६१/२००१/३९ दि. १९.०३.२००३ मधील तरतुदी लागू राहतील. त्यानुसार (अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा B किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा (ब) महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्र शिक्षण मंडळ मुंबई, अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र यापैकी एक प्रमाणपत्र नियुक्ती स्विकारण्याच्या वेळी सादर करावे लागेल किंवा (क) माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाच्या शासन निर्णय क्र. मातंस २०१२/प्र.क्र.२७०/३९, दि.०८.०१.२०१८ मध्ये नमूद सुधारीत तरतूदीनुसार उमेदवाराने संगणक आर्हता प्राप्त केलेली असणे बंधनकारक असेल. तथापि, नियुक्ती स्विकारण्यापूर्वी उमेदवारांनी उपरोक्तप्रमाणे संगणक आर्हता प्राप्त करुन घेतलेली नसल्यास नियुक्ती स्विकारल्यापासून २ वर्षाच्या आत संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. या कालावधीत सदर प्रमाणपत्र सादर न करणा-या उमेदवारांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

७. राज्यकर निरीक्षक पदावरील नियुक्ती स्विकारण्यापूर्वी एखादा उमेदवार अन्य कोणत्याही शासकीय/निमशासकीय/ इतर कार्यालयात नोकरीत असेल तर त्यांना त्या नोकरीचा राजीनामा किंवा कार्यमुक्ती आदेश हजर होणेचे वेळेस सादर करावा लागेल. अन्यथा सदर उमेदवारास राज्यकर निरीक्षक पदावर हजर करुन घेण्यात येणार नाही. तसेच नियुक्तीपूर्वी शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरु अथवा प्रस्तावित नाही याबाबीच्या अधिन राहून नियुक्ती देण्यात येत आहे.

८. अराखीव महिलांसाठी आरक्षित असलेल्या पदावर शिफारस झालेल्या महिला उमेदवारांबाबत शासन निर्णय, महिला व बाल विकास, क्रमांक-महिआ२०२३/प्र.क्र.१२३/कार्याल-२, दिनांक ४ मे, २०२३ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

९. खेळाडूंसाठी राखीव असलेल्या पदावर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांना शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दि.०१ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तसेच दि.१८ ऑगस्ट,२०१६, दि.११ मार्च,२०१९,२४ ऑक्टोबर, २०१९ व दिनांक ३० जून, २०२२च्या शासन निर्णयातील तरतुदी लागु असतील.

१०. दिव्यांगासाठी राखीव असलेल्या पदावर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांच्या दिव्यांग प्रमाणपत्रांबाबत शासन निर्णय सा.प्र.वि.अपंग-१००३/प्र.क्र.१२७/२००३/१६-अ दि.०६ मे, २००४ मधील सुचनांनुसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या आधारे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक दिव्यांग-२०१८/प्र.क्र.११४/१६-अ, दिनांक २९ मे, २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग आरक्षणासंदर्भातील कार्यवाही करण्यात येईल.

११. अनाथांसाठी राखीव असलेल्या पदावर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांच्या अनाथ प्रमाणपत्रांबाबत शासन निर्णय महिला व बालविकास विभाग, क्रमांक : अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दिनांक ०६ एप्रिल, २०२३ दिनांक १० मे,२०२३ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१२. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्ल्यूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ व दिनांक ३१ मे, २०२१ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

१३. ज्या उमेदवारांची शिफारस मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या प्रवर्गातून झालेली आहे आणि ज्या उमेदवारांचे जाती/जमातीचे दावे तपासणीकरिता प्रलंबित आहेत, अशा उमेदवारांची नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र. बीसीसी २०११/ प्र.क्र .१०६४/२०११/१६-ब दि.१२.१२.२०११ मधील तरतूदींनुसार उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र व त्यांच्या पडताळणी विनियमन) अधिनियम, २००० मधील नियम ८ नुसार जात प्रमाणपत्राची वैधता करुन घेण्याची जबाबदारी ही संबंधित उमेदवाराचीच असेल. उक्त अटीच्या अधिन राहून मागासवर्गीय

प्रवर्गातून शिफारस प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या नियुक्त्या करण्यात येत आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र. बीसीसी २०१२/ प्र.क्र .३३२/१२/१६-ब दि. १८.०५.२०१३ मधील तरतूदींनुसार जात पडताळणी समितीने त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले, तर त्या उमेदवाराविरुध्द महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र व त्यांच्या पडताळणी विनियमन) अधिनियम, २००० मधील तरतुदीनुसार तसेच वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार कारवाई करण्यात येईल.

१४. शासन निर्णय वित्त विभाग क्र . अंनियो १००५/१२६/सेवा-४ दि.३१/१०/२००५ व क्र . अंनियो २०१५/NPS/प्र.क्र .३२/सेवा-४ दि.६/४/२०१५ व त्यामध्ये वेळोवेळी करण्याात आलेल्या सुधारणांमधील तरतुदीनुसार १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर ज्या अधिकारी व कर्मचारी यांची शासकीय सेवेत नियुक्ती होईल त्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) म्हणजेच सध्याची राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (NPS) लागू राहील. सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना या उमेदवारांना लागू ठरणार नाही. मात्र उपरोक्त उमेदवारांपैकी जे शासकीय कर्मचारी १ नोव्हेंबर २००५ पूर्वी शासन सेवेत निवृत्ती वेतनार्ह आस्थापनेवर कार्यरत असतील, त्यांना शासन परिपत्रक वित्त विभाग, क्र. अनियो -१००६/८७/सेवा दि.१२.०१.२००७ मध्ये नमूद केलेल्या अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू राहतील.

१५. आयोगाच्या सूचनांप्रमाणे नियुक्तीपूर्वी उमेदवारांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी आवश्यक असल्याने, प्रशासकीय कारणास्तव जरी, ज्या क्रमाने पडताळणी अहवाल प्राप्त होतील त्या क्रमाने उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली, तरी दि.२१.०६.२०२१ रोजीच्या "महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१" मधील नमूद नियम ३(२)(ब)(I) मधील तरतुदींनुसार विहित कालावधीत नियुक्ती स्विकारणाऱ्या उमेदवारांची जेष्ठता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफारस पत्रामधील गुणवत्ताक्रमानुसार निश्चित करण्यात येईल.

१६. **राज्यकर निरीक्षक परीक्षा -२०२३ साठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने online पध्दतीने अर्ज मागविले होते. त्यानुसार आयोगाने सर्व उमेदवारांची शिफारस त्यांनी त्यांच्या आवेदन पत्रात केलेल्या दाव्यानुसार केली असून या उमेदवारांच्या जन्मतारखा, शैक्षणिक पात्रता, मागासवर्गीय किंवा शारिरिक अपंगत्वाबाबतचे दावे आयोगाने उमेदवारांच्या मूळ प्रमाणपत्रावरुन तपासले नसल्याने उमेदवारांना कुठल्याही टप्प्यावर अर्जातील दावे चूकीचे आढळून आल्यास ते नियुक्तीसाठी अपात्र ठरतील, कृपया याची नोंद घेण्यात यावी. आपण आयोगाला केलेल्या अर्जातील दाव्याच्या तपासणीसाठी आवश्यक व योग्य ती प्रमाणपत्रे आपण नियुक्ती प्राधिकाऱ्यांना सादर करु शकला नाहीत तर, आपली शिफारस आपोआप रद्द समजण्यात येईल व तसे आयोगाला कळविण्यात येईल.**

१७. या राज्यकर निरीक्षकांना नियुक्तीच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी प्रवास भत्ता अनुज्ञेय होणार नाही.

१८. जर उमेदवार शासन सेवेतील राज्यकर निरीक्षक या पदावरील नेमणूकीसाठी सदर पदाच्या सेवा प्रवेश नियमातील तरतूदीप्रमाणे पात्र नव्हता अथवा विहित अर्हता प्राप्त नव्हता अथवा त्यांनी नेमणूक मिळविण्यासाठी खोटी माहिती दिली होती अथवा खोटे प्रमाणपत्र सादर केले होते, असे नंतर आढळून आले, तर अशा उमेदवारांच्या सेवा सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र. सीडीआर-१०९३/१०७७/प्र.क.२३/९३ अकरा, दिनांक १२.१०.१९९३ मधील तरतूदीनुसार समाप्त करण्यात येतील तसेच इतर अनुषांगिक कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

१९. सदर नियुक्ती शासनाच्या वेळोवेळी पारित होणाऱ्या निर्णयाच्या अधिन राहून देण्यात येत आहेत.

२०. हे आदेश प्राप्त होताच उमेदवारांनी या आदेशात अट. क्र. १ येथे नमूद केलेल्या बंधपत्रांसह राज्यकर उपायुक्त,आस्थापना-४ ३ रा मजला, वस्तू व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई - ४०० ०१० यांचे कार्यालयात ३० दिवसांच्या आत रुजू होणे आवश्यक राहील. ३० दिवसांच्या विहित मुदतीत राज्यकर निरीक्षक पदावर रुजू न झाल्यास या पदाची नियुक्ती आपोआप रद्द होईल. सदर आदेश व बंधपत्राचे नमुने विभागाच्या www.mahagst.gov.in या संकेतस्थळावर "Whats New" या सदराखाली उपलब्ध आहेत. सदर बंधपत्रांच्या पडताळणीनंतर त्यांना राज्यकर निरीक्षक पदावर मुंबई कार्यालयात रुजू करुन घेतले जाईल.

२१. आदेशातील नमुद उमेदवारांनी नेमणूक देताना किंवा त्यानंतर विशिष्ट ठिकाणी नियुक्ती देण्याकरीता राजकीय किंवा इतर कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष दबाव आणल्यास सदर उमेदवाराविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९८१ मधील तरतुदीनुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

**(मा. विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मान्यतेने)**

**संजय निकम**
**राज्यकर सहआयुक्त (मुख्या-४)**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**प्रत सादर :-**

१. मा. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई.

**प्रत रवाना :-**

१.मा. पोलीस उप महानिरीक्षक तथा मुख्य दक्षता अधिकारी.
२.सर्व अपर राज्यकर आयुक्त.
३.संबंधित राज्यकर सह आयुक्त.
४.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / संबंधित जिल्हा आहरण व कोषागार अधिकारी.
५.संबंधित व्यक्ती.

| धा.क्र.राज्य.निरी २०२३/सरळसेवा नियुक्ती/म.लो.आ./०१/आस्था-४/ब-९९ मुंबई दि. 18 MAR 2026 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| राज्यकर निरीक्षक पदी तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती प्रस्तावित करण्यात आलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवारांची यादी. | | | | | | |
| अ.क्र | गुणवत्ता क्र. | श्री./श्रीम. | उमेदवाराचे नाव | उमेदवाराचा मुळ प्रवर्ग | उमेदवाराचा निवडीचा प्रवर्ग | पदस्थापनेचे प्रस्तावित कार्यालय |
| १ | ६४ | श्री. | चेतन सुरेश तुप्यार | खुला | खुला - सर्वसाधारण- ६४ | अपर राज्यकर आयुक्त, ठाणे, यांचे कार्यालय |

(मा.विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या मान्यतेने)

Nikam

संजय निकम
राज्यकर सहआयुक्त (मुख्या-४)
महाराष्ट्र राज्य मुंबई

# APPENDIX-'A'

## FORM-'A'

## BOND

KNOW ALL MEN BY THESE PRESENTS THAT, I Shri./Smt./Kum.-------------------------------
------------------------------------------of------------------------------------------(Address)
(hereinafter referred to as "The Bounden") am held and firmly bound unto Governor of Maharashtra exercising the executive power of the Government of State of Maharashtra (here in after referred to as 'Government'), in the sum equal to the amount of Pay & Allowance paid for 3 months training, together with interest thereon, at the rate applicable at the time of recovery, per annum from the date of demand till payment to be made to the Government for which, payment well and truly to be made. I bind myself, my heirs, executors, administrators and legal representatives by these presents.

Signed this /-----------------------------------------------------------day of-------------------
2026

Where as on the application of the Bounden, the Bounden has been selected by the Government for the post of State Tax Inspector in the Goods & Services Tax Department of the Government of Maharashtra, on the condition interialia that, the Bounden shall undergo in service training at Mumbai for a period of 3 months (hereinafter referred to as 'the said training') during which period, the Bounden would be paid by the Government every month, pay & allowances as admissible under the rules and that on the completion of the said training the Bounden would serve the Government for the remaining period of 2 years and further that the bounden executes in favor of the Government, a personal Bond and furnishes a surety Bond executed by two sureties in the form prescribed by the Government, being in fact these presents.

NOW THIS BOND IS CONDITIONED TO BE VOID IF:

१) The Bounden diligently prosecutes and completes the said training and faithfully observes and perform the rules governing the said training and shall be of good conduct and character while under such training and attend the said training regularly and on completion of the said training appear for examination, if any, held by the Commissioner of State Tax.

२) The Bounden does not, except in case of an accident or illness duly certified by a competent Medical Authority, absent himself or does not of his own accord, leave the said training before the completion thereof without the written permission of Commissioner of State Tax or is not discharged, removed or dismissed by the authority appointing the Bounden for misconduct, negligence or failure to attend the training idleness or indiscipline

३) After the completion of his training and passing the said examination as aforesaid the Bounden shall faithfully serve the Government, if so required by the Government, as a State Tax Inspector in any part of the State of Maharashtra for a period of not less than two year (inclusive of the period of training), in the pay scale fixed by Government for the said post.

Otherwise the same shall remain in full force and virtue.

IT IS HEREBY AGREED that, if the Bounden commit a breach of any of the above mentioned terms and conditions, the whole of the said sum of the Pay & Allowances drawn by the Bounden during the period of any or such lesser sum as may be determined by the Commissioner of States Tax shall demand, become forthwith payable by the Bounden together with interest at the rate of applicable at the time of recovery per annum, from the date of demand till payment and the amount so payable by the Bounden may, without prejudice to any other rights and

remedies of the government, be recovered from the Bounden as arrears of land revenue.

IN WITNESS WHERE OF THE above named Bounden has here to set his hand the day and year herein above written.

Signed and delivered by Signature Permanent Residential Address

Shri.-----------------------------------------

The above named Bounden in

the presence of ...

1. ------------------------

2. ------------------------

**APPENDIX-'B'**

**FORM-'B'**

**SURETY BOND**

We, the undersigned (1) Shri. ------------------------------------------------------------------------- (2) Shri. --------------------------------------------------- (hereby declare ourselves sureties for --------------------------------------------------------(hereinafter referred to as "The Bounden") who has been selected by the Government of Maharashtra for the post of State Tax Inspector, and hereby guarantee that the Bounden shall do and perform all that he has undertaken to do and perform under the personal Bond dated the ------------day of -----------2026 executed by the Boundent in favour of the Governor of Maharashtra, a copy whereof is hereto annexed and in the event of the Bounden making any default therein, we do hereby jointly and each of us severally, bind ourselves, our respective heirs, executors and administrators to pay to the Governor of Maharashtra (hereinafter referred to as "The Government") the sum of Pay & Allowances drawn by the Bounden during the period of his training or such lesser sum as the Commissioner of State Tax shall demand, to cover any loss or damage that the Government may sustain by reason of such default on the part of the Bounden, together with interest thereon at the rate applicable at the time, per annum, till payment.

And we do hereby further agree that the Government may, without prejudice to any other rights or remedies of the Government, recover from either of us, the said sum as arrears of land revenue and we do hereby further agree that any forbearance in enforcement of the said Bond or any other indulgence granted to the Bounden or any variation of the terms of the said Bond or any time given to the Bounden or any other conditions or circumstances under which, in law a surety would be discharged, will not discharge us from our liability to pay the said sum and for the purpose of enforcement of this Bond our liability under this Bond will be as principal debtor and

joint and several with that of the Bounden and that it will not be necessary for Government to sue the Bounden before suing us.

Dated the ---------------------------day of -----------------------------2026

signed by

1. Shri./Smt.

   ---------------------------------------------------------------------------------

   States

   Present Address

   ---------------------------------------------------------------------------------

   Permanent Address

   ---------------------------------------------------------------------------------

2. Shri./Smt.

   ---------------------------------------------------------------------------------

   States

   Present Address

   ---------------------------------------------------------------------------------

   Permanent Address

   ---------------------------------------------------------------------------------

above named sureties in the presence of

1) Address

2) Address

**ज्या उमेदवारांची शिफारस मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या पदावर झाली आहे.**

**(खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना आवश्यक नाही)**

**(नोटरी करणे आवश्यक )**

## हमीपत्र

मी श्री./श्रीमती /कु.---------------------------------------------------------------------

घोषित करतो / करते की, माझा अनुसूचित जाती /अनुसूचित जमाती/ विमुक्त जाती भटक्या जमाती (अ,ब,क,ड) / विशेष मागास प्रवर्ग /आर्थिकदृष्टया दुर्बल गट प्रवर्ग (EWS) / इतर मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र (शासन निर्णय दि. ५.३.२००५ अन्वये) तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार अवैध /चुकीचे ठरले तर वस्तू व सेवाकर या विभागातील नियुक्ती मिळण्यासंबंधातील कोणतेही फायदे घेण्यास मी पात्र राहणार नाही. सदर प्रमाणपत्र अवैध /चुकीचे ठरल्यास माझी वस्तू व सेवाकर विभागातील राज्यकर निरीक्षक पदावरील नियुक्ती रद्द होईल याची मला जाणीव आहे व याबाबत माझी कसलीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण :-

दिनांक :-

उमेदवारांचे संपूर्ण नाव व स्वाक्षरी

## ज्यांची शिफारस अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू या पदावर झाली आहे.

**(नोटरी करणे आवश्यक)**

**हमीपत्र**

मी श्री./ श्रीमती /कु .------------------------------------------------------------------------------------------

घोषित करतो / करते की, माझी शिफारस अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू या पदावर झाली असून माझ्या ---------------------------- खेळाचे प्रमाणपत्र शासन निर्णय क्र . राक्रीधो-२००२/प्र.क्र .६८/क्रीयसे-२, दिनांक ३०.४.२००५ नुसार तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार अवैध /चुकीचे ठरले तर वस्तू व सेवाकर या विभागातील नियुक्ती मिळण्यासंबंधातील कोणतेही फायदे घेण्यास मी पात्र राहणार नाही. सदर प्रमाणपत्र अवैध /चुकीचे ठरल्यास माझी वस्तू व सेवाकर विभागातील राज्यकर निरीक्षक पदावरील नियुक्ती रद्द होईल यांची मला जाणीव आहे व याबाबत माझी कसलीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण :-

दिनांक :-

उमेदवारांचे संपूर्ण नाव व स्वाक्षरी

## ज्यांची शिफारस महिलांच्या आरक्षित जागेवर झालेली आहे.

( नोटरी करणे आवश्यक )

### हमीपत्र

मी श्रीमती /कुमारी -------------------------------------------------------घोषित करते की, संचालक, महिला व बालकल्याण , महाराष्ट्र राज्य, पुणे-१, यांच्याकडून माझे उन्नत व प्रगत गटात (क्रिमीलेअर) मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (शासन निर्णय महिला व बालविकास विभाग क्रमांक संकीर्ण १०९६/प्र.क्र .३०/का-१० दि. १२.५.८२ व ८२/२००१ /मसेआ २००० / प्र.क्र . ४१५/का २, दि. २५.५.२००१ अन्वये) अवैध / चुकीचे ठरले तर वस्तू व सेवाकर या विभागातील नियुक्ती मिळण्यासंबंधातील कोणतेही फायदे घेण्यास मी पात्र राहणार नाही. सदर प्रमाणपत्र अवैध / चुकीचे ठरल्यास माझी वस्तू व सेवाकर विभागातील राज्यकर निरीक्षक पदावरील नियुक्ती रद्द होईल याची मला जाणीव आहे व याबाबत माझी कसलीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण :-

दिनांक :- उमेदवाराचे संपूर्ण नाव व स्वाक्षरी

<u>ज्यांची शिफारस दिव्यांग प्रवर्गासाठी आरक्षित उमेदवार म्हणून झाली आहे.</u>

**(नोटरी करणे आवश्यक)**

## <u>हमीपत्र</u>

मी श्री./ श्रीमती /कु .---------------------------------------------------------------------------------------------------

घोषित करतो / करते की, माझी शिफारस दिव्यांग उमेदवार म्हणून झाली असून शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग/अपंग १००३/प्र.क्र .१२७/२००३/१६-अ , दिनांक ६ मे २००४ नुसार माझे दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र वैद्यकीय मंडळाने अवैध /चुकीचे ठरले तर वस्तू व सेवा कर विभागातील नियुक्ती मिळण्यासंबंधातील कोणतेही फायदे घेण्यास मी पात्र राहणार नाही. सदर प्रमाणपत्र अवैध /चुकीचे ठरल्यास माझी वस्तू व सेवाकर विभागातील राज्यकर निरीक्षक पदावरील नियुक्ती रद्द होईल यांची मला जाणीव आहे व याबाबत माझी कसलीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण :-

दिनांक :-

उमेदवारांचे संपूर्ण नाव व स्वाक्षरी

(नोटरी करणे आवश्यक )

**<u>हमीपत्र</u>**

मी श्री./ श्रीमती /कु.------------------------------------------------------------------------------------------------ -----------

घोषित करतो /करते की, माझी राज्यकर निरीक्षक या पदी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने घेतलेल्या राज्यकर निरीक्षक परीक्षा-२०२३ मधून निवड झाली आहे. माझी नेमणूक वस्तू व सेवाकर विभागाने वैद्यकिय चाचणीच्या आधिन राहून केलेली आहे. हे मला माहिती आहे व मान्य आहे. जर वैद्यकिय चाचणी अहवालामध्ये विसंगती आढळल्यास माझी वस्तू व सेवाकर विभागातील राज्यकर निरीक्षक पदावरील नियुक्ती रद्द होईल यांची मला जाणीव आहे. तशी पुर्वसूचना मला मिळाली आहे. तसेच वस्तू व सेवाकर विभागातील विभागातील नियुक्ती मिळण्यासंबंधातील कोणतेही फायदे घेण्यास मी पात्र राहणार नाही.

ठिकाण :-

दिनांक :-

उमेदवारांचे संपूर्ण नाव व स्वाक्षरी

## ज्यांची शिफारस अनाथ प्रवर्गासाठी आरक्षित उमेदवार म्हणून झाली आहे.

**(नोटरी करणे आवश्यक )**

## हमीपत्र

मी श्री./ श्रीमती /कु .------------------------------------------------------------------------------------------ ----------घोषित करतो / करते की, माझी शिफारस अनाथ प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदावर राज्यकर निरीक्षक म्हणून झाली असून शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक : अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दिनांक ०६ एप्रिल,२०२३, दिनांक १० मे, २०२३ अनुसार तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार माझे अनाथ प्रमाणपत्र महिला व बाल विकास विभागाने अवैध /चुकीचे ठरले तर वस्तू व सेवा कर विभागातील नियुक्ती मिळण्यासंबंधातील कोणतेही फायदे घेण्यास मी पात्र राहणार नाही. सदर प्रमाणपत्र अवैध /चुकीचे ठरल्यास माझी वस्तू व सेवाकर विभागातील राज्यकर निरीक्षक पदावरील नियुक्ती रद्द होईल यांची मला जाणीव आहे व याबाबत माझी कसलीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण :-

दिनांक :-

उमेदवारांचे संपूर्ण नाव व स्वाक्षरी